ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 7.384

DOIs:10.2018/SS/202506009 --:-- Research Paper / Article / Review

# लिंगभाव सापेक्षतेपासून निरपेक्षतेकडे प्रवास करणारी : 'नातिचरामि'

**शुभलक्ष्मी नाईक गावकर**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड - पुणे
Email - ngshubh5@gmail.com

**सारांश :** मराठी साहित्य क्षेत्रात १९ व्या शतकापासून लिंगभावविषयक प्रश्नांवर चर्चा होत आहे. मात्र या काळातील लिंगभावविषयक प्रश्नांची उकल करणाऱ्या स्त्री लिखित ललित साहित्यापेक्षा पुरुष लिखित साहित्य तुलनेने अधिक प्रभावी वाटते. मुळात स्त्री लिखित अथवा पुरुष लिखित अशी कोटी करणे तेव्हाच उपयुक्त ठरते जेव्हा त्यांचे दृष्टिकोन आणि अभिव्यक्ती भिन्न असते. साहित्य निर्मिती ही केवळ त्या लेखकाची निर्मिती नसून लेखकांची अभिव्यक्ती नियंत्रित करणाऱ्या सांस्कृतिक यंत्रणेचाही त्यावर मोठा प्रभाव असतो. हाच प्रभाव त्याकाळातील स्त्री लिखित ललित साहित्यावर जाणवतो.

स्त्रीवादाच्या प्रभावामुळे १९७५ नंतरच्या स्त्री लिखित साहित्याने मात्र ह्या सांस्कृतिक यंत्रणेला नाकारून सत्त्वशील व वास्तववादी लेखनातून तिलाच उघडे पाडलेले आहे. नव्वदोत्तर काळात अतिशय धीटपणे लिंगभावाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीकारांमध्ये मेघना पेठे यांची 'नातिचरामि' ही कादंबरी प्रस्तुत विधानाचा एक वास्तविक नमूना म्हणता येईल. ही कादंबरी लिंगभावाचा सांस्कृतिक, शारीरिक व मानसिक पातळीवर वेध घेते व एका सम्यक लिंगभानाचा पुरस्कार करते. प्रस्तुत निबंधात 'नातिचरामि' ह्या कादंबरीची लिंगभावात्मक चिकित्सा करून तिच्या साहित्यिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**मुख्य संज्ञा :** लिंगभाव, लिंगभावनिष्ठ राजकारण, स्त्रीवादी साहित्य, कादंबरी.

## 1. प्रास्ताविक :

लिंगभावात्मक सामाजिक संकेतांना आवाहन देण्यासाठी व लिंगभानाची नव्याने परिभाषा करण्यासाठी स्त्रियांचे लेखन महत्त्वाचे माध्यम ठरलेले आहे. मुख्य प्रवाहातील साहित्यात जे वास्तव दुर्लक्षित केले गेले ते स्त्रियांनी प्रकर्षाने मांडल्याचा इतिहास आहे. भाषेप्रमाणेच साहित्यही पुरुषी चौकटीत तयार झालेले असते. त्यामुळे स्त्रियांना व त्यांच्या वास्तविक अनुभवांना पुरेसा न्याय मिळाल्याचे दिसत नाही. एलॅन शोवॉल्टर सांगतात त्या प्रमाणे हे अनुभव अनेकांसाठी अज्ञात असणाऱ्या पोकळीतून (वाइल्ड झोन) येतात. ते वैयक्तिक स्वरूपाचे असूनही मूलतः राजकीय स्वरूपाचे असतात. मात्र स्त्रीलिखित साहित्याने सामाजिक - सांस्कृतिक संकेतांना आवाहन देणारे स्त्रियांचे हेच वास्तववादी अनुभव कथन केले आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून लेखन करणाऱ्या मेघना पेठे याच वैशिष्ट्यामुळे लक्षवेधी लेखिका ठरतात. साहित्याच्या रूढीवादी चौकटीला शह देत लिंगभावानुरूप येणारे मानसिक, शारीरिक व सांस्कृतिक अनुभव त्या तटस्थपणे मांडतात.

मेघना पेठे यांची 'नातिचरामि' ही कादंबरी सन २००५ मध्ये प्रकाशित झाली. ह्या कादंबरीच्या कथानकाचा थोडक्यात विचार करणे महत्त्वाचे वाटते. ह्या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा मीरा ही महानगरातील मध्यमवर्गीय सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्त्री आहे. ह्या कादंबरीच्या निमित्ताने तिच्या भूतकाळाचा साडेआठ वर्षांचा पट उलगडलेला आहे. मीराची दोन लग्ने मोडलेली आहेत. पहिले मोडले याची *"तिला कधीतरी हळहळ वाटते आणि दुसरे झाले याचा पश्चाताप"* होतो. तिचा पहिला नवरा पारंपरिक पुरुषी अहंकार मिरवणारा असतो. तो बायकोला भोग्यवस्तू मानतो व तिला गुलामाची वागणूक देतो. आधुनिक काळातील मीरा आपल्या गरजा जाणते. मात्र तिच्या नवऱ्यासारखे असंख्य पुरुष काळानुरूप स्वतःला बदलून न घेता अजूनही स्त्रियांकडून परंपरावादी अपेक्षाच करताना दिसतात. मीराचे पहिले लग्न मोडण्यामागेही हेच कारण आहे. पाच वर्षांच्या लग्नसंबंधात त्यांच्यात झालेल्या भांडणाचा विषय हा प्रामुख्याने लैंगिक विसंगती असतो. त्याच्या पुरुषत्वाला तिने आवाहन दिल्यावर तिला त्याच्यातील हिंस्त्रतेची नव्याने ओळख होते व ती वेगळी होते. त्यानंतर ती घरी न जाता मैत्रिणिकडे जाते व याच टप्प्यावर ती स्वतःचा, आपल्या परात्मतेचा शोध घेते. कालांतराने तिला आवडणाऱ्या दुसऱ्या पुरुषाशी लग्न करते. मात्र त्या नात्यातही तिला स्त्रीला जाचक ठरणाऱ्या लग्नसंस्था व कुटुंबसंस्था यांच्यातील क्रूरता नव्याने उमजते व ती त्या नात्यालाही पूर्णविराम देते. पुढे तिच्या आयुष्यात एक संसारी मित्र व लोभी नावाचा अजून एक मित्र असे दोघे येतात मात्र तेही नंतर कायमचे निघून जातात. शेवटी तिच्या वाट्याला आलेले एकटे जीवन ती मित्रांच्या सहवासात व नॉस्टेलजीयाचा आधार घेऊन जगते. ह्या कादंबरीत तशा निर्णायक घटना घडत नसल्या तरीही ही कादंबरी विविध संस्थात्मक राजकारणांचा आधुनिक काळातील स्त्री जीवनावर होत असलेल्या परिणामांचा गांभीर्याने वेध घेत; लिंगभावाचा विविध आयामातून शोध घेते.

समीक्षक विजय तापस स्त्री लिखित साहित्यातील निर्मिती प्रक्रियेचा आढावा घेताना लिहितात, *"आत्मविस्मृतीची जाणीव होणे आणि परात्मता साकारणे ही कृतीची पहिली पायरी. परात्म करणाऱ्या व्यवस्थेला नकार देणे ही दुसरी पायरी; तर व्यक्ती म्हणून लिंगनिरपेक्ष मानवतेकडे प्रवास करणे ही तिसरी पायरी ठरते. मात्र या कथित अखेरच्या पायरीवर प्रवास थांबत नाही; तेथे खऱ्या प्रवासाला प्रारंभ होतो. कारण तेथून पुढे लिंगनिरपेक्ष स्वतंत्र आणि व्यापक नैतिक सत्ता उभारण्याचे आव्हान स्वीकारावे लागते. या आव्हानाचा स्वीकार केला तरच त्याज्य ठरवलेल्या संस्कृतीपेक्षा वेगळी संस्कृती निर्माण करता येणे शक्य होते* [विजय तापस, २०१०]". ह्या विश्लेषणाच्या आधारे प्रस्तुत कादंबरीचा विचार केला तर ही कादंबरी वरील निर्देशित तीनही पायऱ्या ओलांडून एका नव्या सम्यक लिंगभान जागृत करणाऱ्या व्यवस्थेचा अंगुलीनिर्देश करते असे म्हणता येईल.

## 2. लिंगभावात्म परात्मभाव

लिंगभावाचा विविध आयामातून शोध घेताना प्रस्तुत कादंबरी स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या परात्मभावाचा आढावा घेते. तसेच स्व-परात्मता चित्रित करतानाच पर-परात्मतेची इतर स्त्री-पुरुष पात्रांच्या माध्यमातून त्या-त्या लिंगभावाच्या चौकटीत राहून चिकित्सा करते. परात्मता ही पितृसत्ताक चौकटीत येत असली तरीही स्त्रियांसारखीच पुरुषांनाही ही संस्था एकटी पाडते असे पेठे लिहितात. पहिल्या घटस्फोटानंतर मीरा हवोवी ह्या तिच्या मैत्रिणीच्या हॉस्टेलवर राहायला निघून जाते व तेव्हाच आपली परात्मता ती साकार करते. ह्या एकटेपणाचा निचरा करण्यासाठी ती डायरी लिहू लागते तरीही तिला एकटे वाटतेच. तिच्या एकटेपणाविषयी पेठे लिहितात, *"आपल्यासारखं कोणीच नाही आपल्याला, या भावनेने एकटं वाटतं.. 'आपलं सगळंच चुकलं' असं वाटतं, तेव्हा एकटं वाटतंच; पण 'आपलं नाही चुकलं, आपलंच बरोबर होतं', असं वाटतं, तेव्हा तर पारच एकटं वाटतं"*. एकटेपणा हा मीरासारख्या बहुतेक बायकांच्या जीवनातील स्थायीभाव आहे. मीराला *'सवय करून घे. आम्ही नाही करून घेतली; आमचे संसार नाही झाले'* असे सल्ले देणारी तिची आई, काकू, सासू व इतर संसारी स्त्रियांच्या आयुष्यातही हा परात्मभाव आहेच. याचाच अर्थ स्त्रियांना समजून घेण्याचा, व्यक्त होण्याचा अवकाश व्यवस्था देत नसल्याने त्यांच्या आयुष्यात ही परात्मता येते. तर पितृसत्ताकतेमुळे पुरुषांना स्वत्वशून्य व सत्ताशरण बनवले जाते

ज्यामुळे त्यांच्या जीवनात परात्मता येते. या दृष्टीने मीराच्या दुसऱ्या नवऱ्याचा विचार करता येतो. मीराचं स्वतंत्र अस्तित्व कधीच समजून न घेता कायम बायकोच्या भूमिकेत तो तिला पाहतो व तिच्याकडून तशाच पारंपरिक अपेक्षा करतो. लग्नसंबंधात आपल्यात जे बिनसलं त्याचे खापर तो मीराच्या मित्रावर फोडतो. घटस्फोटानंतरही तिच्या सहाय्याने आपल्या आयुष्यात आलेली पोकळी तो भरून काढण्याचा प्रयत्न करतो. मात्र आपल्याकडे कमीपणा घेऊन तिला परत बोलावणे त्याच्या पुरुषी अहंकाराला मान्य नसते. तसेच ह्या कादंबरीत आलेली इतर पुरुष पात्रे उदा.: डॉक्टर, भरत, आहो, संसारी मित्र यांच्या आयुष्यातील परात्मतेचे मूळ पितृसत्ताक व्यवस्थाच असलेली दिसते. डॉक्टर आणि भरत पितृसत्ताकतेला काहीसा शह देतात व सत्ताशरणता नाकारतात परंतु यामुळेच त्यांच्या वाट्याला एकटेपणा येतो. मीराचा संसारी मित्र बायको व मुलांसोबतही एकटाच असतो. त्याला समजून घेणारी, त्याला सुसंगत असलेली मीरा मैत्रिणीच्या रूपात त्याला भेटते मात्र मीरासोबत नव्या आयुष्याची सुरुवात करायला तो घाबरतो व पुरुषांनाही एकटं पाडणाऱ्या ह्या सत्तेला शरण जातो.

### 3. लिंगभाव व संवेदनशीलता

माणसांच्या संवेदनशीलतेवर लिंगभावाचा खूप मोठा पगडा असतो असाही एक विचार ह्या कादंबरीत उमटलेला आहे. लिंगभावीकरणाच्या प्रक्रियेत पुरुषांनी कितपत संवेदनशील असावे व बायकांनी कितपत असावे ह्या विषयी आपल्या मनावर काहीएक संस्कार बिंबवले जातात. प्रस्तुत कादंबरीत लग्नसंबंधात असलेल्या मीराची संवेदनशीलता व घटस्फोटानंतरची तिची संवेदनशीलता यात फरक जाणवतो. नव्या शेगडीवर नवऱ्याने पहिला चहा केला म्हणून आनंदाने भारावून जाणारी मीरा; किंवा नवऱ्याचा लहानपणीचा फोटो त्याच्या निरागसपणाचे प्रतीक म्हणून चोरून सांभाळून ठेवणारी मीरा मात्र नात्यात दुरावा आल्यानंतर काहीशी उदासीन होते. घोडा गाडीचे चित्र असलेल्या दोन कॉफीच्या कपांमधील एक कप नवऱ्याने रागाने फोडल्यावर ती जाणीवपूर्वक दुसऱ्या शिल्लक राहिलेल्या कपात कॉफी पिते. मीराच्या भावनांमध्ये झालेला हा बदल म्हणजे तिने विविध शोषण व्यवस्थांना दिलेला नकार दर्शवितो. स्वत्व शोधाच्या टप्प्यावर स्त्रिया खंबीर बनतात व व्यवस्थेने घालून दिलेल्या हळव्या, दुबळ्या स्त्री प्रतिमेला त्या नाकारतात. किंबहुना समोरच्या व्यक्तीने आपल्याला दुबळे समजून आपल्या सोयीनुसार नातेसंबंधातील राजकारणांना दुजोरा देणं त्या नाकारतात. या संदर्भात मीरा तिच्या स्वगतात म्हणते, *“माझ्या डोळ्यात पाणी वगैरे यावं असं तुला वाटतंय का? एखादा मेलोड्रॅमॅटिक शेवट हवाय का तुला या अंकाचा? तर सॉरी! तसा नाही होणार तो. पाणी म्हणशील, तर येईल... खूप वेळा वाहणार आहे ते.. पण आता? नाही. तुझ्यासमोर? नाही.”*

ह्या कादंबरीत आलेल्या स्त्री पात्रांसारखीच पुरुष पात्रांच्या संवेदनशीलतेचीही लिंगभावात्मक चिकित्सा करता येते. मीराच्या दोन्ही नवऱ्यात हिंस्त्रतेचे अनेक दाखले दिसतात. राग वक्त करण्याचे हे वर्तन पद्धतशीरपणे पितृसत्ताक व्यवस्थाच पुरुषांना शिकवत असते. मीराचा दुसरा नवरा तिला अत्यंत प्रिय असलेला त्याचा लहानपणीचा निरागस फोटो फाडून जाळून टाकतो व तिला प्रिय असलेले मांजरीचे पिल्लू खिडकीतून फेकून देतो. तिची भावावस्था जाणून न घेता तो तिला म्हणतो, *“तूच खुंटी आहेस. आम्ही सगळे आमचं असणं जीच्यावर टांगून ठेवतो, ती खुंटी. तूच आहेस. कळलं?”* असे असंख्य दाखले देऊन मेघना पेठे पुरुषांच्या कधी हिंस्त्र तर कधी नाटकी स्वभावाचे चित्रण करतात. मीराच्या व तिच्या नवऱ्याच्या राग व्यक्त करण्याच्या पद्धतीचा विचार केला तर दोन्ही लिंगभावांच्या लिंगभावीकरण प्रक्रियेतील भेद लक्षात येऊ शकतो. आपल्याला समोरची व्यक्ती समजून घेत नाही असे वाटल्यावर मीरा शांत राहणं पसंत करते. तर तिच्या आयुष्यात आलेले पुरुष नेमक्या अशावेळी आपल्यावर झालेले पुरुषी संस्कार सिद्ध करतात. ही हिंस्त्रता केवळ पुरुषांमध्येच दिसते असे नाही; तर बायका-बायकांमधील भगिनीभाव नष्ट करण्यासाठीही तिचा वापर ही व्यवस्था करत असते. या दृष्टीने मीराच्या संसारी मित्राची बायको व मीराची शेजारीण जिला आपला नवरा लग्नबाह्य संबंधात आहे हे माहीत असूनही त्याचा ती स्वीकार करते व दुसऱ्या बाईला दोष देते; या दोघींचा विचार करता येतो. मीराच्या संसारी मित्राच्या

बायकोला त्यांच्यातील संबंधांविषयी कळताच आपल्या नवऱ्यावर राग व्यक्त न करता मीराच्या तोंडावर ॲसिड फेकण्याची इच्छा ती बोलून दाखवते. यातून बायका-बायकांमध्ये लैंगिक राजकारण करणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेने निर्माण केलेली हिंस्त्रता अधोरेखित होते.

### 4. पुरुषभान

ह्या कादंबरीतील डॉक्टर हे पात्र लिंगभावाच्या चौकटी ओलांडून नव्या पुरुषभानाच्या शक्यता सूचित करते. डॉक्टरचे मीरावर एकतर्फी प्रेम असते. मात्र मीरा आपल्यावर प्रेम करत नाही हे वास्तव तो स्वीकारतो. कदाचित सहानुभूतीने, करुणाबुद्धीने मीरा आपल्यापाशी आलीही असती पण मला भीक नको असे त्याला वाटते. मीरावर पुरुषी मालकी हक्क गाजवणे त्याला सहज शक्य होते. तशी सवलत त्याला व्यवस्थेने दिलेलीही असते, मात्र तो तसे करत नाही. उलट तो म्हणतो, *"तुझी आठवण येते. तुझ्या आयुष्यात कधीच डोकावलो नाही. पण तू जिथं असशील, तिथं सुखात असशील, असावीस असं मात्र वाटतं.."* डॉक्टरवरही कदाचित लिंगभावीकरणाच्या प्रक्रियेत तेच संस्कार झाले असतील जे मीराच्या आयुष्यात आलेल्या इतर पुरुषांवर झालेले आहेत. मात्र डॉक्टरने स्वतःच्या लैंगिकतेचा, लिंगभावाचा जितका गांभीर्याने विचार केला आहे तेवढा इतरांनी केला नसावा. कदाचित म्हणूनच दोघांच्या वर्तनात ही भली मोठी दरी दिसत असावी.

### 5. स्त्रीचे लिंगभावात्मक अनुभव

ह्या कादंबरीत मीराच्या अनुभव विश्वाला पर्यायाने तिच्या लिंगभावात्मक अनुभवांना मोठा अवकाश मिळालेला आहे. यात तिला आलेले अनुभव हे प्रातिनिधिक स्वरूपाचे असून ते मुळात स्त्रीनिष्ठ अनुभव आहेत. त्यामुळे तिला आलेल्या लिंगभावात्मक अनुभवांचा शोध स्त्रीनिष्ठ मानसिक, शारीरिक अथवा लैंगिक अनुभव व संस्थात्मक राजकारणातील (कुटुंब व समाज) अनुभव अशा तीन स्तरांवर घेता येतो.

मीरा ही सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे. आपल्या जोडीदाराकडून तिच्या असलेल्या अपेक्षा ह्या काही चंगळवादी संस्कृतीतून आलेल्या नाहीत किंवा त्या पारंपरिक पितृसत्ताक व्यवस्थेतूनही आलेल्या नाहीत. तिच्या फार माफक अपेक्षा आहेत. तो स्वाभिमानाने कमाई करणारा असावा. शिक्षण थोडं जास्त असलेला किंवा थोडं कमी शिकलेलाही तिला मान्य आहे मात्र विचारी असावा. आपल्याला समजून घेणारा. भांडण झाल्यावर नवऱ्यासारखं एकटं सोडून न जाता साथ देणारा. मानाने जगणारा व व्यवस्थेचे ओझे न लादता हवं तसं तिला जगू देणारा पुरुष तिला हवा असतो. तिच्या आयुष्यात आलेले पुरुष तिची ही माफक अपेक्षाही पूर्ण करू शकत नाहीत तेव्हा ती एकटं राहणं स्वीकारते. स्वतःच स्वतःला आधार देते. तरीही आपल्याजवळही आपल्यासारखीच एखादी व्यक्ती असावी असे तिला सतत वाटते. त्यातल्या त्यात आयुष्याच्या संधिप्रकाशात तिला भरत ह्या तिच्या मित्राची सोबत होते. मीराच्या माध्यमातून मेघना पेठे यांनी समकालीन लिंगभाव संघर्षाचा हा एक वेगळा आयाम समोर आणलेला आहे. आजची सुशिक्षित विचारी स्त्री नवऱ्यालाही व्यक्त होण्याचा अवकाश देऊ पाहते मात्र त्याच्या लिंगभावाच्या जडणघडणीमुळे त्याचा पुरुषार्थ त्याला तो अवकाश देत नाही. ज्यामुळे स्त्री व पुरुष दोघांच्या वाट्याला दुःख व अस्वस्थताच येते.

मीराच्या लिंगभावात्मक अनुभवांचा शारीरिक अथवा लैंगिक पातळीवर वेध घेताना मेघना पेठे यांनी अतिशय बोल्ड पद्धतीने कथन केलेले आहे. मराठी साहित्यात स्त्री शरीर व स्त्रियांच्या लैंगिक अनुभवांकडे पारंपरिक पुरुषी चौकटीतूनच पाहण्यात आलेले आहे; '*नातीचरामि*', शांता गोखले यांची *'रीटा वेलिणकर'*, कविता महाजन लिखित *'ब्र'*, *'भिन्न'* अशा कादंबऱ्या मात्र अपवाद ठरतात. मीराची स्वतःच्या स्त्री-शरीराकडे, लैंगिक संबंधांकडे पाहण्याची दृष्टी रूढ चाकोरी छेदणारी आहे. लग्नसंस्था व कुटुंबसंस्था यांच्या मुळाशी स्त्रीच्या गर्भाशयाचे आरक्षण करणे आहे अशी निर्भीड भूमिका मीरा घेते. ज्यामुळे स्त्रीनिष्ठ लैंगिक अनुभवांचा विचार खाजगी व सामाजिक अशा दोन्ही स्तरांवर एकाच वेळी लेखिका करतात.

मीरा स्वतःच्या लैंगिकतेकडे सजगपणे पाहते. शरीरसंबंधाबद्दल, आपल्या गरजांबद्दल, संभोगाबद्दल, संभोगोत्तर शारीरिक व मानसिक अवस्थे बद्दल, योनि-शुचितेविषयी, शिश्न-शुचितेबद्दल ती निर्भीडपणे बोलते. ह्या दृष्टीने पुढील अवतरण पाहता येईल- *".. बायका बेडमध्ये हे नसतीलही सांगत आपल्या शेजऱ्याला- पण त्यांना ते सांगावसं वाटतं. संस्कारांच्या बुरख्याआड त्या संकोचानं वाट बघत राहतात, तुम्ही विचाराल याची; किंवा तुमचं तुम्ही समजून जाल याची; आणि तसं काही नाहीच झालं, (बहुदा नाहीच होत!) तर हळू हळू निराश होत जातात; किंवा या स्वार्थी पक्षपाती एकतर्फी व्यवहाराला विटतात; स्वप्नरंजनात रमतात; वा प्रत्यक्षात पर्याय शोधतात; आणि बेडमध्ये तुमच्याबरोबर मात्र थंड होत जातात! कित्येक अभाग्यांना तर आपल्यालाही हा आनंद मिळू शकतो हेच पन्नाशीपर्यंतसुद्धा कळत नाही!! बेडमधलं हे पॉलिटिक्स उरलेल्या इतर आयुष्यात नसतंच असं तुम्हाला वाटतं? जिला तुम्ही समंजस आणि गरीब सालस मानता, ती एक नउमेद झालेली, विझलेली बाई आहे याची शंका तरी येते का तुमच्या मनात?"* अशा शब्दात मीरा पूर्ण व्यवस्थेलाच प्रश्नांकित करते. मीराच्या वाट्याला आलेला रत होतानाचा हिंस्त्र अनुभव हा देखील प्रातिनिधिक स्वरूपाचा म्हणता येईल. मेघना पेठे यांची ही लेखनातील बंडखोरी लक्षवेधी आहे. ती केवळ साहित्यातील कल्पित परिघे ओलांडत नाही तर लिंगभावात्मक साचेबंद विचारधारेलाही शह देते व स्त्रीनिष्ठ अनुभव वास्तविक स्वरूपात प्रकट करते.

व्यवस्थात्मक राजकारणांचा विचार करताना कुटुंबसंस्था, लग्नसंस्था व समाजव्यवस्था ह्या तीन प्रमुख संस्थांच्या परिप्रेक्ष्यातून लिंगभावाच्या अनुषंगाने विचार करता येतो. मीराला ह्या तीनही व्यवस्था स्वत्वशून्य बनवण्याचा प्रयत्न करतात मात्र मीरा तिघांना नाकारते. कुटुंबसंस्थेत कुटुंबाचे शील सांभाळण्याची जबाबदारी स्त्रीवर येते. कुटुंबात तिला जपले जाते. तिच्या अनुभव क्षेत्रांना मर्यादा घातली जाते. त्यात आईवडीलांच्या घरात न मावण्याइतकी ती मोठी झाल्यावर त्या घरातून बाहेर निघायचं तर लग्न हा एकच पर्याय कोणत्याही मध्यमवर्गीय स्त्रीजवळ शिल्लक राहतो. तोच मीराजवळही होता. पहिलं लग्न मोडल्यावर ती माहेरी जात नाही. तिथे जाऊन हतबल होऊन जगणं तिला मान्य नाही. सासरीही तिच्याकडून पारंपरिक अपेक्षाच ठेवल्या जातात कारण तिच्या गरजांना समजून घेतल्याने त्यांच्या सुखवस्तू जगण्यात बाधा येण्याचा धोका असतो. त्यामुळे *"जेवू खाऊ घालणारी, तो प्रवासाला निघताना त्याच्या बॅगा भरणारी, त्याच्या अस्तित्वाभोवती फेर धरून भिरभिरणारी, नाव बदलणारी, कुंकू लावणारी, पिंडीवरच्या नागासारखी सतत सावधपणे त्याच्यावर नजर ठेवून त्याचा पुरुषी इगो पुंजावणारी आणि मुख्य म्हणजे त्याच्या मुलांची आई असलेली"* स्त्री मीराच्या नवऱ्यासारखीच बहुतेकांना हवी असते. ह्या शोषणाधिष्ठित संस्था नाकारणाऱ्या बायकांचाही आपला समाज स्वीकार करत नाही, हे वास्तवही मीराला घटस्फोटानंतर शेजाऱ्यांकडून व इतर लोकांकडून आलेल्या अनुभवांच्या माध्यमातून मेघना पेठे चित्रित करतात.

### 6. लैंगिक राजकारण / लिंगभावलक्ष्यी राजकारण

'नातिचरामि' कादंबरीचे अजून एक महत्त्वाचे विशेष म्हणजे ही कादंबरी लिंगभावलक्ष्यी राजकारण, त्यातील गुंतागुंत, व्यामिश्रता यांचे सूक्ष्म व प्रभावशाली चित्रण करतात. ह्या राजकारणात पुरुषाला प्राधान्य असल्याने त्यांच्याकडे सत्ता येते व स्त्रीकडे दास्य; मात्र यात पुरुषांचेही शोषण होत असतेच ही कल्पना ह्या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. पारंपरिक स्त्री-पुरुषातील नाते एकरेशीय व सुटसुटीत नसतेच. ते अत्यंत क्लिष्ट व उगाचच व्यामिश्र बनवले जाते. त्यातूनच त्या नात्यातील नाट्य पारंपरिक चौकटीत टिकवले जाते. हीच अनुभूती मीरालाही येते. चंदाच्या साहाय्याने मीराचा नवरा मीराच्या मनात आपल्याविषयी असुरक्षितता व असूया निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा मीरा म्हणते, *".. मला काही नेमकं जेलस होता यायचं नाही. 'झालं' नाही, तरी टिपिकल बाई-पुरुषांच्यातल्या राजकारणात तसं 'दाखवायचं' तरी असतं, म्हणजे दुसऱ्याला तो ग्रेट वगैरे असं वाटून बरंऽऽ वाटतं, अन्यथा दुसरा आपल्या लेखी काही उरलाच नाहीये असा अर्थ होऊ शकतो.."* स्त्री-पुरुषांच्या नात्यातील ह्या बाष्कळ राजकारणात मीराला अजिबात रस नसतो तरीही तिला थोडी मुरड घालून वागावे लागते. ह्या राजकारणात पुरुषी अहंकाराला जोजवणे हा अनावधानाने येणारा एक महत्त्वाचा भाग

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 7.384
Volume - 8, Issue - 6, June - 2025

बनतो. आपल्या आईवडीलांच्या वैवाहिक नात्याचाही मीरा गांभीर्याने विचार करते व त्यातले लिंगभावलक्ष्यी राजकारण उघडे पाडते. आपली आई आपल्या वडिलांपेक्षा अनेक पटीने उजवी असूनही तिने स्वतःचे स्वतःच बोन्साय केल्याचे ती कथन करते व म्हणते *"..अशा हजारो बायका माझ्या महितीतल्या.. आपल्या नवऱ्यापेक्षा कितीतरी पटीनं स्युपीरिअर असलेल्या- ज्यांनी स्वतःला छाटून घेतलं, संसाराच्या कुंडीत शोभेचं फुलझाड होण्यासाठी- उगीच भराभर वाढलो, वडापिंपळासारखे, तर घराचं छत भेदून बाहेर पडावं लागेल म्हणून. एकुणात नवरा आपल्यापेक्षा दशांगुळं जास्त असलेला बरा! आणि नसला, तरी तशी कल्पना करून घ्यायची जिवाची आणि समर्पण, त्या भ्रमाच्या बारक्या तंतूला लटकवून ठेवायचं.."* असे अनेक दाखले देऊन लेखिका लिंगभावलक्ष्यी राजकारणाचा पट उलगडतात. तसेच आपल्या आयुष्यातील पुरुष हा सतत आपल्याच मालकीचा राहावा ही भावना प्रत्येक बाईचीही असू शकते. आपला मुलगा लग्न झाला तरीही आपल्या मर्जीत असावा ही जशी आईची इच्छा असते तशीच 'तू असताना मला बायकोची काय तमा' हा आविर्भाव पुरुषाचाही असतोच. मीराच्या नवऱ्याच्या माध्यमातून पेठेंनी ह्या वास्तवावरही प्रकाशझोत टाकलेला आहे. मीराच्या नवऱ्याला सतत असं वाटतं की त्यांच्यात लोभी ह्या तिच्या मित्रामुळे बिनसलं. तो ह्या भ्रमात खुश असतो किंबहुना तसे गृहीत धरणे त्याच्या सोयीचे असते. अशा वेळी आपल्या चुकांची जबाबदारी आपण घेतल्याने बऱ्याच समस्या दूर करणे संभव असते मात्र आपण तसे करत नाही. विशेषत्वाने पुरुष ते करत नाहीत.

लिंगभावलक्ष्यी राजकारणामुळे जशी पुरुषांच्या वाट्याला सत्ता येते तसेच स्त्रीकडे दास्य येते. मीरा एक सुशिक्षित विचारी स्त्री तर आहेच पण ती तेवढीच निर्भीडही आहे म्हणून ती दास्यपणाचा स्वीकार न करता आपला वेगळा मार्ग निवडू शकली. वास्तवात मात्र अशा मीरा दुर्मिळच असतात. मीराची आई, काकू, शेजारीण, संसारी मित्राची बायको अशा स्त्रिया मोठ्या प्रमाणात वास्तवात आढळतात. अशा स्त्रिया सुशिक्षित जरी असल्या तरीही सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात वावरत असताना त्या आलेल्या परिस्थितीचा निमूटपणे स्वीकार करतात. नवरा, मुलं, कुटुंब यांच्याशिवाय तिच्या आयुष्याला पूर्णत्व येत नाही हेच संस्कार तिच्यावर बिंबवले जातात. त्यामुळे नवरा कसाही वागला तरीही मीराच्या शेजारणीसारखी किंवा संसारी मित्राच्या बायकोसारख्याच त्या नवऱ्याला सोडत नाही. किंबहुना एकमेकींना *'थोडं सहन करायला शिका. सवय करून घ्या.'* असेच उपदेश देतात.

लिंगभावलक्ष्यी राजकारण मालकी हक्काच्या समजुतींच्या माध्यमातून अजून बळकट बनते. आपल्या आयुष्यातील पुरुषावर केवळ आपलाच हक्क नाही हे वास्तव एकवेळ स्त्री पचवून घेते मात्र पुरुषाला ते बिलकुल सहन नाही होत. घटस्फोटानंतरही मीराने केवळ आपल्याशीच प्रामाणिक राहावे असे तिच्या नवऱ्याला मनोमन वाटते. लोभी हा तिचा मित्रही ह्याच भावनेने तिच्यापासून दुरावतो. आपल्या आयुष्यात असलेल्या स्त्रीवर / स्त्रियांवर, त्यांच्या शारीरिक, मानसिक परिघावर आपलाच अधिकार असावा असे बहुतेक पुरुषांना वाटत असते.

मीरा लिंगभावाचा अनेक अंगांनी शोध घेते. तिला वाटतं योनि-शुचिता हा संकेत सुद्धा माणसं आपल्या सोयीनुसार वापरतात. ह्या शुचितेच्या संकेतामागे सुरक्षिततेचा संकेत कार्यरत असतो असे ती म्हणते. ज्या पुरुषासोबत आपण रत झालो तो आपल्याला व आपल्या बाळाला स्वीकारेल का, अशी बायकांना शंका वाटते. त्याने नाही स्वीकारले तरीही दुसरा पुरुष स्वीकारेल का असाही विचार त्यांच्या मनात येतो. पुढे मीरा म्हणते की बायकांना अडकवण्यासाठी पुरुष बायकांना गरोदर करतात. सत्ता संपत्तीच्या संचयापासून गर्भाशयांच्या ह्या आरक्षणांची सुरुवात झाली. तसेच शुचिता संकेताविषयी ती म्हणते की एड्सच्या जमान्यात योनि-शुचितेबरोबरच, शिश्न-शुचितेबद्दलही बोलायला हवं. मीराचे लिंगभाव व लैंगिकतेविषयी प्रकटलेले हे विचार अतिशय कालसुसंगत ठरतात.

### 7. सम्यक लिंगभान

समीक्षक विजय तपास यांनी सांगितलेल्या उपरनिर्देशित पायऱ्यांपैकी तिसरी पायरी म्हणजे व्यक्ती म्हणून लिंगनिरपेक्ष मानवतेकडे प्रवास करणे. ह्या टप्प्यावरच सम्यक संस्कृतीच्या निर्मितीच्या शक्यता शोधल्या जातात. प्रस्तुत कादंबरीतही सम्यक लिंगभानाचा विचार करण्यात आलेला आहे. ज्याच्या आधारे सम्यक संस्कृतीची निर्मिती होणे शक्य वाटते.

ह्या कादंबरीचे एक अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती स्त्री पात्रांबरोबरच पुरुष पात्रांचा, त्यांच्या सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातील जडणघडणीचा शोध घेते व एका नव्या पुरुषभानाच्या शक्यता दाखवते. स्त्री-पुरूषांचे निम्मे अधिक प्रश्न ह्या नव्या पुरुषभानाने सुटू शकतात. ह्या दृष्टीने डॉक्टर, संसारी मित्र, भरत अशी पात्रे लक्षणीय आहेत. तसेच इतर पुरुष पात्रांवर केवळ आरोप-प्रत्यारोप न करता त्यांची जडणघडण समजून घेण्याचा पुरेसा अवकाशही प्रस्तुत कादंबरीत आहे.

२

स्त्रीवादी साहित्याचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे तिची उत्स्फूर्त अभिव्यक्ती. 'नातिचरामि' कादंबरीत आत्मशोध व परशोध करणारी अभिव्यक्ती आहे. मीरा ही तशी आत्ममग्न व आत्मसंवादी स्त्री आहे. तरीही ती स्वतः सोबतच आपल्या आजूबाजूला असलेल्या लोकांचा, त्यांच्या जडणघडणीचा, लिंगभावाच्या सुप्त राजकारणाचा शोध घेत जगते. जीवनाची अत्यंत प्रगल्भ व समंजस जाण तिला आहे. त्यामुळे प्रत्येक अनुभव ती उलटसुलट तपासून पाहते व त्यातून स्वतःसाठी काहीएक जीवनमूल्य तयार करते. त्या जीवनमूल्यांशी प्रामाणिक राहून जगण्याचा ती प्रयत्न करते. स्त्रियांना निखळ व्यक्ती म्हणून जगू न देता सांस्कृतिक मूल्यांचे वहन करणारा एक घटक मानणाऱ्या व्यवस्थेला ती प्रश्नांकीत करते.

प्रस्तुत कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखिका मेघना पेठे यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्यांच्या मते वास्तव आणि कल्पित ह्यात एक अंधूक सीमारेषा असते; ज्याचा वापर कलावंत आपल्या कलाकृतीत करत असतो. याचाच अर्थ 'नातिचरामि' कादंबरीत आलेले चिंतन हे केवळ मीराचे चिंतन नसून तो एक सनातन प्रश्न बनतो. जीवनाच्या ह्या गुंतागुंतीत लेखिका सामाजिक व सांस्कृतिक संकेत नियमांना प्राधान्य देत नाहीत तर त्या व्यक्तीच्या मनाच्या नितळपणाला व आपल्या जगण्याच्या तळाचा शोध घेण्याला प्राधान्य देतात. त्यामुळे नैतिकतेचा शोध घेताना लेखिकेची भूमिका व्यक्तीपासून समष्टीचा प्रवास करणारी ठरते.

### 8. भाषिक उपयोजन

अभिव्यक्तीचा विचार करताना साहित्यकृतीतील भाषिक घटकाचा विशेषत्वाने शोध घ्यावा लागतो. प्रस्तुत कादंबरीची भाषाशैली व भाषिक उपयोजन ह्या घटकांचा विचार करताना काही ठळक गोष्टी निदर्शनास येतात. मीरा ही आत्ममग्न व चिंतनशील स्त्री असल्यामुळे तिच्या स्वगतात तिच्या अनुभवांना गडदपणा आणण्यासाठी भाषेचा कसोशीने वापर केल्याचे दिसते. या दृष्टीने पुढील उदाहरणे पाहता येतील- *“माझ्या तथाकथित संतापाला तू नेहमीच ही अशी जागा दाखवली आहेस. ‘संतापलीयस? चल, संताप. हा मी चाललो. आता संताप विरून तू सरळ वठणीवर आल्यावरच मी येतो परत.’ पण ह्या अशानं तो संताप विरत नाही मुला, तो फक्त जिरतो. तो जिरल्यावर माणसं कामाला लागतात. हो, जगत राहायचं म्हटल्यावर कामाला लागलंच पाहिजे ना? पण माझा तो तथाकथित संताप जिरल्यावर जेव्हा तू परत येशील, तेव्हा संताप नसेल, पण मीही ती नसेन.”, “नेमकं कशावर केलं प्रेम?.. प्रतिकांवरच केलंस की काय? आळशी माणसं तेच करतात. आणि आळशी तर होतासच तू. प्रतीकं काही काही मागत नाहीत. प्रतीकं बदलत नाहीत. उलगडत जात नाहीत. ‘नाही’ म्हणत नाहीत. ‘का’ विचारत नाहीत. हे सगळं जीवंत माणसं करतात. प्रतीकं काय करतात? काही क्षणांना बंदिस्त करतात. सोप्पं असतं बघ प्रतीकांवर प्रेम करणं. आणि प्रतीकं जपणंही. आणि म्हणूनच तू मलाही प्रतीक*

*करून टाकलंस. आणि तुझं माझ्यावर आहेच प्रेम असं एक सोयीचा पवित्रा घेऊन मला विसरून गेलास."* या व्यतिरिक्त उपरोधिक भाषिक प्रयोगाचा वापरही लेखिका करतात - *"मला माझ्या माजी पतीचा आणि माझा प्रचंड खेद वाटतो"* किंवा *"आज माझ्या डीवोर्सची पाचवी जयंती आहे".*

समीक्षक किशोर सानप मेघना पेठे यांच्या भाषाशैली विषयी लिहितात, *"वाक्यांमध्ये अर्धी अर्धी वाक्यं पूर्णत्वाकडे नेताना, लेखिकेनं अर्धविराम, स्वल्पविराम अधिक वापरले आहेत. पूर्णविराम कमी वापरले आहेत. त्यामुळे भाषेच्या आकलनात कुठेच अडचणी येत नाहीत. वाक्प्रचार, म्हणी, मिथकं, लोककथा, लोकगीतं, प्रतिमा आणि प्रतीकं, लग्नसंस्थादिंवरील भाष्ये आदींनी लेखिकेची भाषिक समृद्धता आणि शैलीचे निराळेपण जाणवते. भाषेचा जाणीवपूर्वक लालित्यपूर्ण वापर लेखिकेनं केलेला आहे."* [किशोर सानप, २०१२]

मेघना पेठे यांच्या भाषिक उपयोजनाचे अजून एक विशेष म्हणजे त्यांची भाषा स्त्रीभाषेच्या रूढ लिंगभावात्मक चौकटींना शह देते. तथाकथित स्त्रीभाषेला न शोभणाऱ्या शिव्यांचा वापर पेठेंनी काही ठिकाणी केलेला आहे. तसेच लैंगिक जाणिवांचे वर्णन करतानाही त्या बऱ्याच वेळा चाकोरी मोडून वेगळे प्रयोग करताना दिसतात- *"मला नेकीनं आणि उत्साहानं जगणारा आणि जगू देणारा, निरोगी, प्रामाणिक, सहचर, सोबती हवा आहे. मला त्याच्याबरोबर वैध सेक्स हवा आहे."* , *"एकदा तिनं त्याला तसं म्हटलं, तर म्हणाला, की "थंड बायकांची ही असलीच नाटकं असतात!" ती वैतागलीच... एक दिवस याचं आटोपल्यावर लगोलग याच्या समोरच मास्टर्बेट केलं. तर हा कल्चर शॉक्ड्!"*

ज्यूडीथ बटलर यांच्या मते, लिंगभावीकरणाच्या प्रक्रियेत भाषा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असते. भाषा आणि लिंगभाव हे कधीच तटस्थ असू शकत नाहीत; तर यात सत्तेचे राजकारण दडलेले असते. एका विशिष्ट लिंगभावाकडे भाषेची मक्तेदारी असते तर इतर गौण मानल्या जाणाऱ्या लिंगभावांना आपले अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषेचा पुरेसा वापर करता येत नाही किंवा रूढ चाकोरीबद्ध भाषा वापरावी लागते. या विश्लेषणातून प्रस्तुत कादंबरीचा विचार केल्यास रूढ सांस्कृतिक व्यवस्थेची चौकट स्त्रियांना त्यांचे लैंगिक अनुभव व्यक्त करण्यासाठी अवकाश देत नाही असे दिसून येते. कादंबरीकारालाही भाषेची ही मर्यादा जाणवते. त्यामुळे कधी अशा अनुभवांचे वर्णन करताना ती पुरुषी भाषेचा स्वीकार करते तर कधी इंग्रजी भाषेत संवाद लिहिते. हीच मर्यादा शांता गोखले यांना *रीटा*चे लैंगिक अनुभव कथन करतानाही जाणवते.

**9. प्रतिकात्मकता**

परात्मभाव हा मीराच्या वाट्याला आलेला स्थायीभाव आहे. त्यातून येणाऱ्या दुःखाची अभिव्यक्ती अतिशय काव्यात्म शैलीत लेखिका करतात. मिर्झा गालिब यांना दुःखाचा महाकवी मानले जाते. मीराच्या एकांतवासात तिला गालिबच्या गझला साथ देतात. तिची भावावस्था नेमकेपणे टिपण्यासाठी लेखिकेने विविध अवतरणांचा कलात्मक वापर केल्याचे दिसते. तसेच मीरा स्वतःच्या नैतिकतेचा विचार करताना तुकोबांच्या तटस्थतेचा व परखड विचारांचा दाखला लेखिका देतात. कादंबरीच्या शेवटच्या भागात भरत आणि मीरा यांच्यात सुरू असलेल्या चर्चेत भरत मीराला म्हणतो, *"तुझ्या आयुष्यात जे झालं, त्याला तुकोबानं तरी व्यभिचार म्हटलं नसतं मीरा!"*

'नातिचरामि' हे वचन लग्नविधीत पती आपल्या पत्नीला देत असतो. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना मध्ये कोणतेच व्यत्यय मी येऊ देणार नाही व हे कार्य मी अखंडीतपणे सुरू ठेवेन- असा या वचनाचा अर्थ आहे. वास्तवात मात्र हा एक भ्रमच म्हणावा. प्रस्तुत कादंबरीत लग्नसंस्थेची पोकळी दाखवून दिलेली आहे. त्यामुळे 'नातिचरामि' हे शीर्षक जरी उपरोधात्मक वाटत असले तरीही ह्या वचनाला बदलत्या काळाबरोबर नवा अर्थ लेखिका देतात. कादंबरीच्या शेवटी भरत मीराला नेमके हेच वचन देताना म्हणतो, *"आठवणींचे अन्वय लावताना, आणि मध्ये मध्ये सुटणारं शहाणपणाचं भान*

*गोळा करताना, मृत्यूनं आपण विलग होईपर्यंत, मी माझ्या मैत्रीच्या मर्यादांचं उल्लंघन करणार नाही, त्या कुठल्याच वेळी मी तुला अंतर देणार नाही. Till death do us part, नातिचरामि! नातिचरामि! नातिचरामि!"*

मीराची भावावस्था प्रकट करण्यासाठी प्रतिमांचा वापरही अत्यंत कलात्मक पद्धतीने लेखिकेने केलेला आहे. प्रस्तुत कादंबरीच्या प्रतिमासृष्टित संसारातील विविध गोष्टी उदाहरणार्थ भांडी, चूल, शेगडी यांचा वापर बाईच्या अस्तित्वावर भाष्य करण्यासाठी केलेला आहे. याव्यतिरिक्त मांजर, कबुतर अशा पशू-पक्ष्यांनाही ह्या कादंबरीच्या प्रतिमासृष्टित विशेष स्थान आहे. तसेच ह्या कादंबरीचे अजून एक अभिव्यक्तीचे वैशिष्ट्य म्हणजे विक्षिप्तता. मीरा भूतकाळातील आठवणीत रममाण असताना तिला मध्येच चहा हवासा वाटतो. नव्या घरात गेल्यावर तिला अगोदर चहाची आठवण येते. केवळ त्यासाठी ती शेगडी घेऊन येते. ह्या विक्षिप्तपणाचे अत्यंत तुरळक दाखले जरी मिळत असले तरीही तो मीराच्या अभिव्यक्तीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**10. रचनावैशिष्ट्य**

'नातिचरामि' कादंबरीचे एक महत्त्वाचे रचनावैशिष्ट्य असे की, ही कादंबरी मीराच्या जीवन कहाणीचे कथन जे घडत गेले तसे न करता फ्लॅशबॅक तंत्राचा वापर करते. विजय तापस सांगतात त्या प्रमाणे एपिसोडीक रचनाबंधाच्या साहाय्याने ह्या कादंबरीच्या कलागुणांना अधिक वाव मिळालेला आहे. तसेच कादंबरीतील व्यक्ती-व्यक्ती संबंधात घडणाऱ्या घटनापरंपरांमागे एक सुव्यवस्थित व्यवस्थांचे जाळे कार्यरत असलेले दिसते. कादंबरीची ही संरचनाच लिंगभावलक्ष्यी राजकारणाचे अनेक कंगोरे प्रकट करते. हीच ह्या कादंबरीची सामाजिक कृती ठरते. प्रस्तुत कादंबरीचे मूल्यात्मक फलित अधोरेखित करताना काही ठळक वैशिष्ट्ये नोंदवता येतील. मीराने प्रस्थापित शोषण व्यवस्थेला, सत्ताशरणतेला, प्रस्थापित लिंगभावात्मक संकेतव्यूहाला दिलेला नकार ह्या कादंबरीची बंडखोरी ठरते; तर मिराच्या माध्यमातून आत्मविस्मृतीतून स्वत्वशोधाचा प्रवास करताना सम्यक लिंगभावाच्या शक्यतांचा शोध घेणं हे ह्या कादंबरीचे सामाजिक दायित्व ठरते.

**11. समारोप :** नव्वदोत्तर मराठी कथात्म साहित्यात लिंगभावाचा अत्यंत गांभीर्याने शोध घेणारी कलाकृती म्हणून मेघना पेठे यांच्या 'नातिचरामि' कादंबरीचा उल्लेख करावा लागतो. प्रस्तुत कादंबरीत लिंगभावाचा खाजगी जीवनात शोध घेतानाच विविध संस्थात्मक राजकारणांच्या परिप्रेक्ष्यातही लिंगभावाचा शोध घेण्यात आलेला आहे. स्त्री व पुरूषांचे दमन करणाऱ्या शोषण व्यवस्थेला नकार देऊन सम्यक लिंगभान जागृत करणाऱ्या व्यवस्थांच्या शक्यतांचा शोध घेण्याचे सामर्थ्य प्रस्तुत कलाकृतीत आढळते. ह्या कादंबरीचे सामाजिक दायित्व पार पाडत असतानाच साहित्यिक सौंदर्यस्थळांनाही पुरेसा न्याय मेघना पेठे यांनी दिलेला आहे.

**संदर्भ सूची:**


1. गोरे, दादा. *स्त्रियांचे समकालीन साहित्य.* अक्षरवाङ्मय प्रकाशन, 2022.
2. गोरे, दादा, संपा. *एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन.* अक्षरयात्रा, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, 2021.
3. तापस, विजय. "सेल्फ पोर्ट्रेट ते कम्युनिटी पोर्ट्रेट." *१९८० नंतरचे स्त्री-निर्मित कथनपर साहित्य,* संपा. पुष्पलता राजापुरे-तापस, मुंबई विद्यापीठ व शब्दालय प्रकाशन, 2010, पृ. 115–125.
4. पेठे, मेघना. *नातिचरामि.* ९ वी आवृत्ती, राजहंस प्रकाशन, 2020.
5. भागवत, वंदना. *स्त्रीवाद, साहित्य आणि समीक्षा.* डायमंड पब्लिकेशन्स, 2018.
6. सानप, किशोर. *समकालीन स्त्रियांच्या कादंबऱ्या.* आकांक्षा प्रकाशन, 2012.
7. Butler, Judith. *Gender Trouble*. Routledge, 1990.
8. DeKoven, Marianne. "Modernism and Gender." *Modernism*, edited by Michael Levenson, 2nd ed., Cambridge University Press, 2011, pp. 212–231.